SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-0231 2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र University WEBSITE : www.unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A' Grade

Dr. R. V. Gurav
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175
Email: dsw@unishivaji.ac.in

==========================================================================

संदर्भ क. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/1560

दिनांक : 15/03/2018

प्रति,

मा. विभागप्रमुख, (सर्व विभाग)/
मा. अधिविभागप्रमुख, (सर्व अधिविभाग)
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : गुणगौरव/सत्कार समारंभ आणि शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थित राहणेबाबत..**

महोदय/महोदया,

सन 2017–18 मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघाने राष्ट्रीय कव्वाली स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक, राज्यस्तरीय इंद्रधनुष्य युवा महोत्सवामध्ये द्वितीय क्रमांक, पश्चिम विभागीय युवा महोत्सवामध्ये सर्वसाधारण विजेतेपदासह संगीत विभागातील विजेतेपद तसेच राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये चमकदार कामगिरी केलेली आहे व विद्यापीठाचे नाव उंचावलेले आहे.

सदर संघातील विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतूक करणे तसेच त्यांच्या मार्गदर्शकांचा सत्कार करण्यासाठी गुणगौरव/सत्कार समारंभ व "सांस्कृतिक देवाण–घेवाण" अंतर्गत शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांचा एकत्रित सांस्कृतिक कार्यक्रम सोमवार दि. 19/03/2018 रोजी दिक्षांत समारंभानंतर सायंकाळी 5 ते 8 यावेळेत विद्यापीठाचे लोककला केंद्र येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमामध्ये विविध स्तरावर विद्यार्थ्यांनी सादर केलेले व पारितोषिक प्राप्त कलाप्रकार सादर केले जाणार आहेत.

विद्यापीठाच्या या यशामध्ये आपल्या सर्वांचे तसेच आपल्या कुटूंबियांचे प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष योगदान आहे. तरी सदर कार्यक्रमास आपण स्वतः उपस्थित रहावे तसेच आपले विभागातील सर्व अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी /अधिविभागातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी त्याचप्रमाणे अधिविभाग विद्यार्थी मंडळाचे सदस्य यांना सहकुटूंब उपस्थित राहणेबाबत आग्रहाचे निमंत्रण...

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

D/AcerBackup/acerbackup/DSW/Suresh/Cultural Programme